महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या सेवक आकृतीबंधात पदनिहाय झालेल्या बदलास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः कृपमं-१२१८/प्र.क्र.२२१ /२१-स
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २० जुलै, २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय क्रमांक मकृप-२००९/प्र.क्र.४९/२१ स, दिनांक २४.०१.२०१३
२. महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे पत्र क्र.कृपमं/प्रशासन/सेवक आकृतीबंध/ मंजूरी/ १९७६/ २०१८, दिनांक १६.०८.२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या सेवकांच्या सरळसेवा व पदोन्नतीद्वारे सेवाप्रवेशांचे प्रमाण संदर्भाधिन दि. २४.०१.२०१३ च्या शासन निर्णयान्वये मंजूर कण्यात आले होते. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ यांच्या संदर्भाधिन दि. १६.०८.२०१८ रोजीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने “उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी)” या पदावर “सहाय्यक सरव्यवस्थापक (अभियांत्रिकी)” ह्या संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नतीसाठी उपलब्ध करुन देणेबाबत तसेच एन्टॉमॉलॉजीस्टचे एक पद, टेक्निकल ऑफीसरची २ पदे व विधी अधिकाऱ्याचे एक पद, अशी एकूण ४ पदे व्यवस्थापक या संवर्गात तसेच ग्रंथपाल हे एक पद वरिष्ठ सहाय्यक या संवर्गात समोयोजित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या सेवक आकृतीबंधात पदनिहाय झालेल्या बदलास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या मंजूर आकृतीबंधातील खालील पदांच्या समायोजनास शासन मान्यता देण्यात येत आहे.

अ. उपसरव्यवस्थापक :

उपसरव्यवस्थापक या मंजूर ८ पदांपैकी १ पद कमी करुन उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी) हे एक पद नव्याने निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर पदावर सहाय्यक सरव्यवस्थापक (अभियांत्रिकी) ह्या संवर्गातील अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात येईल. उपसरव्यवस्थापक व उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी) ह्या पदांचे प्रतिनियुक्तीचे व पदोन्नतीचे प्रमाण खालीलप्रमाणे निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	मंजूर पदे	प्रतिनियुक्तीचे प्रमाण	पदे	पदोन्नतीचे प्रमाण	पदे
१	उपसरव्यवस्थापक	७	४०%	३	६०%	४
२	उपसरव्यवस्थापक (अभियांत्रिकी)	१	०	०	१००%	१

ब.व्यवस्थापक :

व्यवस्थापक या संवर्गात एन्टॉमॉलॉजीस्टचे एक पद, टेक्निकल ऑफीसरची २ पदे व विधी अधिकाऱ्याचे एक पद, अशी एकूण ४ पदे समायोजित करण्यास व या पदावर हॉर्टीकल्चर डेव्हलपमेंट ऑफीसर व सहाय्यक व्यवस्थापक ह्या संवर्गातून ५०:५० टक्के या प्रमाणे पदोन्नतीने भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	सध्याची पदे	समायोजीत पदे	एकूण पदे	सरळसेवेचे प्रमाण (%)	पदे	पदोन्नतीचे प्रमाण	पदे
१	व्यवस्थापक	२८	०४	३२	०%	०	१००% ("हॉर्टीकल्चर डेव्हलपमेंट ऑफीसर" व "सहाय्यक व्यवस्थापक" ह्या संवर्गातून ५०:५० टक्के या प्रमाणे)	३२

क. वरिष्ठ सहाय्यक :

वरिष्ठ सहाय्यक या संवर्गात ग्रंथपाल हे एक पद समायोजित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदाचे नाव	सध्याची पदे	समायोजीत पदे	एकूण पदे	सरळसेवेचे प्रमाण (%)	पदे	पदोन्नतीचे प्रमाण	पदे
१	वरिष्ठ सहाय्यक	२२	०१	२३	२५%	०६	७५%	१७

२. "हॉर्टीकल्चर डेव्हलपमेंट ऑफीसर" हे पद "सहाय्यक व्यवस्थापक" या संवर्गात समाविष्ट करण्याचा मंडळाचा प्रस्ताव होता. मात्र, या प्रस्तावामुळे "सहाय्यक व्यवस्थापक" या पदावरील पदोन्नतीच्या कोट्यातील पदसंख्या व ज्या पदावरुन पदोन्नती देण्यात येणार होती, त्या "वरिष्ठ सहाय्यक" या पदांची मंजूर संख्या सारखीच राहणार होती, हे लक्षात घेऊन मंडळाचा प्रस्ताव मान्य

करण्यात आलेला नाही. यामुळे “हॉर्टीकल्चर डेव्हलपमेंट ऑफीसर” व “सहाय्यक व्यवस्थापक” ही पदे स्वतंत्रपणे कायम राहतील तसेच या पदांवर पूर्वीप्रमाणेच नियुक्त्या करता येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७२०१२१३२७९००२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KALU GONYA VALVI

Digitally signed by KALU GONYA VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=714701fc3db9c38a46f4cd82e1e450b51a9e92eede8c323934f82edb538d3b20, postalCode=400032, street=MANTRALAYA , MUMBAI , serialNumber=8c5d0f275c3d9a21db07fecf7919c2d83796e88930d62d44e7a4a6d4cbee7e0e, ou=CO OPERATION MARKETING AND TEXTILE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KALU GONYA VALVI
Date: 2019.07.20 12:17:57 +05'30'

(का.गो.वळवी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (पणन), मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (पणन) मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (सहकार / पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, पुणे
६. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. निवडनस्ती (२१-स)